करोना 2020/सूचना/आदेश क्र.140

महाराष्ट्र शासन
जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी कार्यालय, रायगड -अलिबाग
आपत्ती व्यवस्थापन विभाग, सामान्य शाखा
हिराकोट तळयाजवळ, अलिबाग, जि.रायगड
दुरध्वनी क्र.:- ०२१४१-२२२०९७/२२२११८/२२२३२२ फॅक्स क्र.:- ०२१४१-२२७४५१/२२२०२५
ईमेल: collector_raigad@maharashtra.gov.in / rdcraigad@gmail.com

क्र.साशा/कार्या-१/ब-५/आ.व्य./करोना/प्रतिबंधात्मक उपाय/२०२० दि.२७/०३/२०२०

**तत्काळ/महत्वाचे**

**प्रति,**

१) महाव्यवस्थापक, जे.एस.डब्ल्यू.स्टील डोलवी, ता.पेण, जि.रायगड
२) महाव्यवस्थापक, जे.एस.डब्ल्यू.स्टील साळाव, ता.मुरुड, जि.रायगड
३) महाव्यवस्थापक, जे.एस.डब्ल्यू.सिमेंट डोलवी, ता.पेण, जि.रायगड

**विषय:- कोरोना विषाणू- प्रतिबंधात्मक उपाय योजना.**

आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ मधील २५ अन्वये जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची स्थापना करण्यात आलेली आहे व त्यातील पोट कलम २ (अ) नुसार जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी हे उक्त प्राधिकरणाचे पदसिध्द अध्यक्ष आहेत.

राज्य शासनाने कोरोना विषाणू (COVID १९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक कायदा १८९७ दिनांक १३/०३/२०२० पासून लागू करुन सदर कायद्यामधील तरतुदीनुसार अधिसुचना निर्गमित करण्यात आलेली आहे.

त्या अनुषंगाने आपणास सूचित करण्यात येते की, कोरोना विषाणूचा प्रतिबंध करताना सामाजिक बांधिलकी म्हणून आपल्याकडील CSR फंडामधून आपल्या कारखान्यांमधे कार्यरत कामगार व त्यांचे कुटुंबीय, तसेच कारखान्याच्या आजुबाजूच्या गावांमधील ग्रामस्थ यांचेसाठी आरोग्य तपासणी शिबीर घेण्यात यावे व त्यांना COVID-१९ पासून बचावासाठी प्रशिक्षण देण्यात यावे. तसेच कारखान्याचा परिसर व आजुबाजूची गावे यांमध्ये जंतूनाशक फवारणी (Fumigation) करून घेण्यात यावी. कोरोना विषाणूचा (COVID १९) प्रादुर्भाव कमी करण्यासाठी आपले अमुल्य सहकार्य दयावे.

(निधी चौधरी)
जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी
रायगड-अलिबाग

प्रत : मा.विभागीय आयुक्त कोकण विभाग, कोकण भवन यांस माहितीस्तव.
प्रत : उपविभागीय अधिकारी पेण यांना उचित कार्यवाहीस्तव.

(निधी चौधरी)
जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी
रायगड-अलिबाग

Scanned with CamScanner